बोलके भांडे



पुन:लेखन: व्हर्जिनिया हेव्हिलँड
चित्रे: मेलिसा स्वीट

बोलके भांडे

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



कोणे एके काळी एक माणूस आणि त्याची पत्नी एका गावातील झोपडीत राहात असत. ती गावातील सर्वात छोटी आणि गरीब झोपडी होती. ते इतके गरीब होते की बऱ्याचदा त्यांना भुकेल्या पोटी झोपावे लागत असे. त्यांना घरातील जवळजवळ सर्वच वस्तू विकाव्या लागल्या. पण त्यांनी आपली गाय कशीतरी जपून ठेवली होती. शेवटी एके दिवशी आपल्याला गाय विकावी लागेल, हे त्यांना कळून चुकले. गायीला बाजारात विकण्यासाठी गरीब माणूस तिला घराबाहेर घेऊन गेला.



गायीला रस्त्यावरून नेत असताना एका अनोळखी माणसाने त्याला हाक दिली. अनोळखी माणसाने त्याला गाय विकणार का, किती किंमतीला वगैरे प्रश्न विचारले.

"शंभर क्राऊनमध्ये विकेन," तो म्हणाला.

"मी तुला पैसे नाही देऊ शकत," अनोळखी माणूस म्हणाला, "पण माझ्याकडे एक भांडं आहे, जे शंभर क्राऊनएवढंच किंमती आहे. ते मी तुला गायीच्या बदल्यात देऊ शकतो." अनोळखी माणसाने त्याला आपले लोखंडी भांडे दाखवले. त्याला तीन पाय आणि एक मूठ होती.

"भांडं!" गायीचा मालक ओरडला. "यात ठेवायला माझ्याकडे काहीच नाही, मग हे माझ्या काय कामाचं? माझी बायका-मुलं हे लोखंडी भांडं खाऊ शकत नाहीत. नाही, मला गायीच्या बदल्यात पैसेच हवेत."





दोघेजण एकमेकांकडे, गायीकडे आणि भांड्याकडे पाहू लागले. त्याचवेळी ते तीन पायांचे भांडे बोलू लागले, “मला घेऊन जा”. गरीब माणसाने विचार केला की हे भांडे जर बोलू शकत असेल तर नक्कीच आणखी काही करामतीसुद्धा करत असेल. म्हणून, त्याने हा व्यवहार मान्य केला. त्याने आपली गाय देऊन ते भांडे घेतले आणि तो घरी परतला.

घरी परतल्यावर आधी तो आपल्या गोठ्यात गेला. कारण आपल्या पत्नीसमोर जायला तो घाबरत होता. त्याने ते भांडे गायीच्या गव्हाणीला बांधून ठेवले. मग झोपडीत जाऊन त्याने पत्नीकडे काही खायला मागितले. बराच वेळ पायी प्रवास केल्यामुळे त्याला खूप भूक लागली होती.

“कसा झाला व्यवहार? गायीला चांगली किंमत मिळाली ना?” पत्नीने त्याला विचारले.

“होय, चांगली किंमत मिळाली गायीला,” तो उत्तरला.

“चांगली गोष्ट आहे,” ती म्हणाली. “आता या पैशांनी बरेच दिवस घर चालवता येईल.”

“नाही,” उसासा टाकत तो म्हणाला, “गायीच्या बदल्यात मला पैसे मिळाले नाहीत.”

“अरे देवा!” ती ओरडली. “मग काय मिळालं तुम्हाला?”

त्याने पत्नीला गोठ्यात जाऊन बघायला सांगितले.







आपल्या पतीने गायीच्या बदल्यात तीन पायांचे भांडे आणले आहे, हे पाहून पत्नीने त्याची चांगलीच खरडपट्टी काढली. “तुम्ही महामूर्ख आहात. मी स्वतःच गायीला बाजारात नेलं असतं तर बरं झालं असतं! असा मूर्खपणा मी आजवर कधी पाहिला नाही!” ती रडगाणे गाऊ लागली.

पण त्याचवेळी अचानक भांडे ओरडले, “मला स्वच्छ करून चुलीवर चढव.”

पत्नीचे डोळे आश्चर्याने विस्फारले. आता विचार करण्याची पाळी तिची होती. तिने विचार केला की भांडे बोलू शकते म्हणजे आणखी काहीतरी अद्भूत काम नक्कीच करू शकेल. तिने ते भांडे काळजीपूर्वक धुतले, स्वच्छ केले आणि ते आगीवर ठेवले.





“मी उडी मारतो, मी उडी मारतो!” भांडे ओरडू लागले

“उडी मारून कुठे जाणार तू?” पत्नीने विचारले.

“श्रीमंत माणसाच्या घरी, श्रीमंत माणसाच्या घरी!” भांडे उत्तरले, उडी मारून चुलीवरून खाली आले, दरवाजाकडे धावले आणि धावतच अंगण ओलांडून रस्त्यावर गेले. तीन पायांवर शक्य तितक्या वेगाने ते धावू लागले.



श्रीमंत माणसाने गरीबांना कधीच काही दिले नव्हते. त्याचे घर फार दूर नव्हते. त्याची पत्नी भाकरी करत होती. भांडे धावत त्या घरात शिरले आणि उडी मारून टेबलवर चढले. “अरे, किती अद्भूत! मला पुडींग बनवायला तुझीच गरज होती. लगेच बनवायचंय मला.” एवढे बोलून ती त्या भांड्यात पीठ, साखर, दही, मनुका, बदाम, मसाले वगैरे टाकू लागली. भांड्याने समाधानाने ते सगळे पदार्थ आपल्या पोटात घेतले.



पण श्रीमंत माणसाची पत्नी भांडे चुलीवर चढवण्यासाठी ते उचलू लागली तेव्हा भांड्याचे तीन छोटे पाय चालू लागले. भांडे उघड्या दरवाजातून अंगणात आले. “अरे देवा, तू माझं पुडींग घेऊन कुठे चाललास?” ती स्त्री ओरडू लागली. “गरीब माणसाच्या घरी,” भांडे उत्तरले आणि वेगाने बाहेरच्या रस्त्यावर धावू लागले.



गरीब माणसाने आणि त्याच्या पत्नीने पुडींगने भरलेले भांडे उड्या मारत येताना पाहिले. त्यांना खूप आनंद झाला. पतीने पत्नीला लगेच म्हटले की त्याने केलेला गायीचा व्यवहार चांगला ठरला की नाही?

“होय,” पत्नीने मान्य केले. ती आनंदात होती, समाधानी होती.



पुढल्या दिवशी सकाळी भांडे पुन्हा ओरडले, “मी उडी मारतो, मी उडी मारतो!”

“कुठे जाणार तू उड्या मारत?” सर्वांनी विचारले.

“श्रीमंत माणसाच्या शेतावर!” रस्त्यावर धाव घेता घेता भांडे ओरडले. शेतावर पोहोचल्यावर ते उडी मारून दरवाजातून आत शिरले. “ते बघा काळं भांडं!” गव्हाचे पीक झोडपणारे लोक ओरडले. “यात किती गहू मावतो, बघूया.” त्यांनी भांड्यात एक पोते गहू टाकले. पण भांडे भरले नाही. त्यांनी आणखी एक पोते गहू त्यात टाकले. तरीही भांडे पूर्ण भरले नाही. ते गहू टाकत राहिले. गव्हाचे सगळे दाणे भांड्यात टाकून झाले तेव्हासुद्धा भांड्यात थोडी जागा रिकामी होती. म्हणजे आणखी थोडा गहू त्यात मावू शकला असता.







शेतातील सारा गहू संपला तेव्हा तीन छोटे पाय चालू लागले. तेथील लोकांच्या लक्षात येईपर्यंत भांडे दरवाज्यापर्यंत पोहोचले होते.

“थांब, थांब!” सगळे ओरडू लागले. “आमचा गहू घेऊन कुठे निघालास?”

“गरीब माणसाच्या घरी,” भांडे उत्तरले आणि रस्त्यावर धावू लागले. सर्वांची बोबडी वळली आणि ते मागे हटले.

गरीब कुटुंब खूप आनंदीत झाले. एवढा गहू त्यांना अनेक वर्षे पुरला असता.



तिसऱ्या दिवशी सकाळी भांडे पुन्हा उड्या मारत रस्त्यावर गेले. खूप छान दिवस होता. सूर्य तेजाने चमकत होता. श्रीमंत माणसाने खुल्या खिडकीजवळ ठेवलेल्या टेबलवर आपली सोन्याची नाणी पसरून ठेवली होती. यामुळे त्या नाण्यांवर चढलेली बुरशी निघून गेली होती. अचानक भांडे त्या टेबलवर आले. श्रीमंत माणूस नाणी मोजण्यात गर्क होता. पण भांडे टेबलवर आल्याचे त्याला कळलेच नाही.



त्याला ते भांडे नाणी साठवायला उपयुक्त वाटले. त्याने मुठी भरभरून सोन्याची नाणी त्यात टाकली. त्याने सगळी नाणी भांड्यात टाकल्यावर भांडे उडी मारून खिडकीच्या चौकटीवर गेले.

“थांब!” श्रीमंत माणूस ओरडला. “माझी नाणी घेऊन कुठे चाललास?”

“गरीब माणसाच्या घरी,” असं म्हणत भांडे रस्त्यावर उड्या मारत निघाले. त्याच्यात ठेवलेल्या नाण्यांचा छनछन आवाज होऊ लागला.





भांडे गरीब माणसाच्या घरात जाऊन थांबले. गरीब माणसाच्या कुटुंबाने भांड्यातील नाण्यांचा खजिना पाहिला तेव्हा ते आनंदाने ओरडू लागले.

"मला धुवून स्वच्छ करा आणि एका बाजुला ठेवा," भांडे म्हणाले.

पुढल्या दिवशी सकाळी भांडे पुन्हा उड्या मारायला सज्ज होते.

"उड्या मारत किती दूरवर जाणार?" गरीब माणूस आणि त्याच्या पत्नीने विचारले.

"श्रीमंत माणसाच्या घरात!" असे म्हणत भांडे पुन्हा उड्या मारत रस्त्यावर धावू लागले. श्रीमंत माणसाच्या स्वयंपाकघरात पोहोचल्यावरच ते थांबले.

श्रीमंत माणूस तेव्हा तिथेच होता. भांड्याला पाहिल्यावर तो ओरडू लागला, “या भांड्याने आमचं पुडींग, गहू, नाणी हे सारं चोरून नेलं. हे सगळं आता मी परत घेणार त्याच्याकडून!”

त्याने झडप घालून भांड्यांची मूठ पकडली. पण मग त्याच्या लक्षात आले की तो मुठीला चिकटला होता.

“मी उडी मारतो, मी उडी मारतो!” भांडे ओरडले.

“उड्या मारत तू तुला पाहिजे तिथे जा, उत्तर ध्रुवावर जा, पण मला सोड!” माणूस किंचाळला. तो भांड्यापासून सुटका करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता. पण तीन पायांचे भांडे उड्या मारत पुढेच जाऊ लागले आणि सोबत श्रीमंत माणसाला फरफटत नेऊ लागले.



गरीब माणसाला आणि त्याच्या पत्नीला खिडकीबाहेर भांडे आणि त्याच्या मुठीला चिकटलेला श्रीमंत माणूस दिसले. पण त्यांना रोखावे, असे त्यांच्या मनात आले नाही. माझ्या माहितीप्रमाणे भांडे थेट उत्तर ध्रुवावर गेले, सोबत त्या श्रीमंत माणसाला घेऊन.

गरीब कुटुंब आता श्रीमंत झाले. बऱ्याचदा ते त्या तीन पायांच्या अद्भत भांड्याचा विचार करत. त्यांच्या भल्यासाठी त्या भांड्याने बऱ्याच उड्या मारल्या होत्या. पण आता ते नाहीसे झाले होते. पुन्हा कधीच त्यांना ते बोलके भांडे दिसले नाही.

समाप्त

